# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०१/०१/२०२५ अनु.क्र. ०१

## (अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/आंजिब हजर पो.अ.वर्धा/१०८७५/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ :-** (१) या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/आंजिब-स्विकृती/८७१०/२०२४, दि.०३.१०.२०२४
(२) पोलीस अधिक्षक,वर्धा पोअव/कक्ष-६/आंजिब-कार्यमुक्त /पो.अंमलदार /२०२४/ ८११८दि.०९/१२/२०२४

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे संदर्भीय क्र. १ अन्वये आंतरजिल्हा बदली अंतर्गत विनंतीवरुन पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे स्विकृती देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पोलीस अधिक्षक,वर्धा यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना बदलीवर हजर होण्यास दिनांक १०/१२/२०२४ चे मा.नंतर कार्यमुक्त केले आहे. नियंत्रण कक्ष वर्धा यांचा स्टेशन डायरी साना १५/२४ दि.१२/१२/२०२४ मा.नंतर सदर पोलीस शिपाई बदलीवर हजर होण्यास आल्याने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पोलीस शिपाई पदावर या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येत असुन त्यांची नेमणुक त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदाराचे पदनाम/ ब.क्र. व संपुर्ण नाव | मुळ घटक | कार्यमुक्त केल्याचा दिनांक | या घटकात हजर झाल्याचा दिनांक | स्विकृतीचे पद व प्रवर्ग | देण्यात आलेला नविन ब.क्र. | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि/१११६ अविनाश सुमेरसिंग राठोड | पोलीस अधिक्षक वर्धा | १२/१२/२०२४ मा.नंतर | १३/१२/२०२४ मा.पुर्व | पोलीस शिपाई वि.जा.अ. | १११६ | पोलीस मुख्यालय अमरावती शहर |

वर नमुद पोलीस अंमलदार हे आंतरजिल्हा बदली अंतर्गत बदलुन आल्याने त्यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. संकिर्ण १०१७/३८४३/प्र.क्र. ४६९/पोल-५ दिनांक २६.१०.२०१७ मधील तरतुदीनुसार वरील पोलीस शिपाई यांची सेवा जेष्ठता त्याच्या भरती वर्षात अमरावती शहर आस्थापनेवर सेवाजेष्ठतेने सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित करण्यात येईल.

वर नमुद पोलीस शिपाई यांनी प्रथम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आमद देवुन तेथे शासकिय संरजाम घ्यावा व नंतर नेमणुकीच्या ठिकाणी हजर व्हावेत.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१. पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/मपोहवा-०५ केळझरे+३/११२००/२०२४ अमरावती शहर दिनांक २७/१२/२०२४**

## आदेश

**संदर्भ क्रमांक :-** १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक १३०६, १३२२, १३१९, १३२०, १३२१, १३३३/२०२४ गैरहजर कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअश/विचौ-२/गैरहजर/कसुरी अहवाल /का.दा.नो./मपोहवा-०५ केळझरे + ५/८३७५/२०२४, दिनांक १८/०९/२०२४

**कसुरदारचे नाव :-** १) मपोहवा/०५ वंदना केळझरे, २) मपोशि/५९६ पुजा पांडे,
३) मपोहवा/१६७ सुनिता बोडके, ४)मपोशि/९०५ प्रज्ञा गोडाने,
सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे कर्तव्य नेमण्यात आलेले होते. तरी तुम्ही वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन काही वेळा साठी अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय पोलीस खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | मपोहवा/०५ वंदना केळझरे | पो.मुख्या. अम.शहर | दि.१०/०७/२०२४ चे ०८:२५ वा. रोजी मध्यवर्ती कारागृह मेन गेट सुरक्षा गार्ड डयुटीवर गैरहजर. | दि.१०/०७/२०२४ चे ०८:२५ वाजता ते १२:४५ वाजता पर्यत एकुण ०५ तास गैरहजर. |
| ०२ | मपोशि/५९६ पुजा पांडे | पो.मुख्या. अम.शहर | दि. ११/०७/२०२४ चे ०८:०० वाजता गणनेवर हजर राहणे अपेक्षित असतांना गणना गैरहजर राहिले. | दि.११/०७/२०२४ चे ०८:१५ वाजता ते ०८:४० वाजता पर्यत एकुण ५५ मिनीट गैरहजर. |
| ०३ | मपोहवा/१६७ सुनिता बोडके | पो.मुख्या. अम.शहर | दि. ११/०७/२०२४ रोजी सकाळी ०८:०० वाजता नविन वसाहत पिकेट कर्तव्य लावले असता गैरहजर राहिले. | दि.११/०७/२०२४ चे ०८:१५ वाजता ते ११:२० वाजता पर्यत एकुण ०३ तास ३५ मिनीट गैरहजर. |
| ०४ | मपोशि/९०५ प्रज्ञा गोंडाने | पो.मुख्या. अम.शहर | दि.११/०७/२०२४ रोजी ०८:०० वाजता गणनेवर जेल आरोपी खाली वारंट रिमांड वाढविणे डयुटी लावण्यात आली असता गैरहजर. दि.११/०७/२०२४ रोजी ११/१० वा. कर्तव्यावर हजर. | दि.११/०७/२०२४ चे ०८:१५ वाजता ते ११:१० वाजता पर्यत एकुण ०३ तास २५ मिनीट गैरहजर. |
| | | | दि.१२/०७/२०२४ रोजी ०८:०० वा. गणना गैरहजर. दिनांक १२/०७/२०२४ रोजी १२:२० वाजता कर्तव्यावर हजर. | दि.१२/०७/२०२४ चे ०८:१० वाजता ते १२:२० वाजता पर्यत एकुण०४ तास ३० मिनीट गैरहजर. |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/- (अक्षरी - पाचशे रुपये फक्त)** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्तीक व समाधानकारक वाटत नसल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- (अक्षरी - पाचशे रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतीत सादर करु शकता.

**२. पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोहवा-१८८ यादव/१०७६७/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक :-** १) अमरावती जिल्हा बार असोसिएशन, अमरावती यांनी दिनांक २३/०४/२०२४ रोजी दिलेल्या तक्रारी बाबत

२) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/परि-१/चौकशी अहवाल/७३९/२०२४, दिनांक १०/०५/२०२४

३) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअश/विचौ-२/तक्रार अर्ज/चौकशी अहवाल/का.दा.नो./पोउपनि-भार्गव + २/५१८४/२०२४, दिनांक ३०/०५/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोहवा/१८८ संतोष यादव, नेमणुकपोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोहवा/१८८ संतोष यादव, पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक १७/०४/२०२४ रोजी सदर प्रकरणाचे संबंधाने पो.स्टे.नागपुरी गेट येथे ०२ गटातील लोकांनी एकमेकांविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन दोन्ही गटाचे तक्रारी प्रमाणे ०२ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी (१) फिर्यादी नामे सैय्यद खालीद अली रहेमत अली, वय ४९ वर्ष रा.मसानगंज ईतवारा बाजार, अमरावती यांचे लेखी तक्रारीवरुन अप क्र. १४६/२०२४ कलम ३९७, ३५२, २९४, ५०६ (२), १०८, १४३, १४७, १४८, १४९, ३२३ भादवि प्रमाणे दिनांक १७/०४/२०२४ चे १७.५६ वा. दाखल असुन सदर गुन्हयांचा तपास सपोनि वैशाली चव्हाण, पो.स्टे.नागपुरी गेट हया करीत आहेत. तसेच (२) फिर्यादी नामे अजीज खान रहेमत खान, वय ७५ वर्ष रा.अराफत कॉलणी धरकाटयांचे मागे अमरावती यांचे फिर्यादी वरुन अप क्र. १४७/२०२४ कलम ३९७, ४५२, ५०६(२), १४३, १४६, १४७, १४८, १४९, ६५४, ३५४(अ), ३२३ भादवि प्रमाणे दिनांक १७/०४/२०२४ चे २१.०४ वा. दाखल असुन सदर गुन्हयांचा तपास सपोनि श्री अनंता ठाकरे, पो.स्टे.नागुपरी गेट हे करीत आहेत.

अमरावती जिल्हा बार असोसिएशन, अमरावती यांनी दिलेल्या तक्रार अर्जा प्रमाणे चौकशी केली असुन पो.स्टे.नागपुरी गेट येथे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांनी स्वता: जावुन प्रत्यक्ष भेट देवुन सदर प्रकरणामधील पो.स्टे.नागुपरी गेट येथील दिनांक १७/०४/२०२४ रोजीचे सी.सी.टी.व्ही.फ्रुटेजची तपासणी केली असता वरील नमुद प्रमाणे गुन्हे दाखल असुन दोन्ही गुन्हयांचे तपास सुरु आहे. (१) श्री जितेंद्र भार्गव, पोलीस उपनिरीक्षक, तुमची डिओ डयुटी, (२) पोहवा/१८८ संतोष यादव, स्टेशन डायरी व (३) मपोशि/१६६६ निशाचौधरी, सी.सी.टी.एन.एस. डयुटी असतांना सुध्दा सदर प्रकरणातील फिर्यादी हे पो.स्टे.ला आल्यानंतर दखलपात्र गुन्हयांची हकिकत प्राप्त झाल्यास तात्काळ गुन्हा दाखल करुन घेणे गरजेचे होते, तरी सुध्दा तुम्ही फिर्यादी पो.स्टे.ला तक्रार देण्यासाठी आल्यानंतर तात्काळ गुन्हा दाखल केला नसल्याचे दिसुन येत आहे. अमरावती जिल्हा बार असोसीएशन, अमरावती चे पदाधिकारी पो.स्टे.ला आले होते. त्या पदाधिका-यांचा अनादर व त्यांचेशी गैरवर्तन केल्याचे अर्जात नमुद केले आहे. तरी तुम्ही अमरावती जिल्हा बार असोसीएशन, अमरावती चे पदाधिकारी यांचे म्हणने ऐकुन घेवुन त्यांचे योग्य समाधान करणे अपेक्षित होते. तुम्ही अर्जदार अमरावती बार असोसिएशनचे पदाधिकारी यांचे समाधान न केल्याचे चौकशी मध्ये दिसुन येत आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले नसल्याने पुन्हा संधीचे पत्र क्रमांक ६०८४/२०२४, दिनांक ०३/०७/२०२४ अन्वये संधी देण्यात आली असुन संधीचे पत्र सुध्दा तुम्हाला तामील झालेल आहे, तरी तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर न झाल्याने पुन्हा संधीचे पत्र क्रमांक ८६१४/२०२४, दिनांक २७/०९/२०२४ अन्वये स्पष्टीकरण सादर करणे करीता संधी देण्यात आली असुन तुम्ही स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा बिनतारी संदेश दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी आमचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले नाही. व स्पष्टीकरण सुध्दा सादर केलेले नाही. तरी तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतीत सादर करु शकता.

**३. पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/ग्रेड श्रेणी पोउपनि-६२७ देशमुख/१०७६५/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/परि-१/कसुरी अह./२६३/२०२४, दिनांक ०९/०३/२०२४
२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/का.दा.नो./ग्रेड श्रेणी पोउपनि-६२७ देशमुख/३८१४२०२४, दिनांक १२/०४/२०२४

**कसुरदारचे नाव** :- ग्रेड श्रेणी पोउपनि/६२७ रविंद्र माणिकराव देशमुख, नेमणुकपोलीस स्टेशन नांदगाव पेठ, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही श्रेणी पोउपनि/६२७ रविंद्र माणिकराव देशमुख, पोलीस स्टेशन नांदगाव पेठ, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पोलीस स्टेशन नांदगाव पेठ, अमरावती शहर येथे दिनांक १६/०८/२०२२ रोजी दाखल अप क्र. २८७/२०२२ कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवि सहकलम १३४ (अ) (ब) महाराष्ट्र मोटार नियम

१९८९ मधील गुन्हयात अर्जदार श्रीमती नमीता प्रतुल अंभोरे, रा.प्लॉट नं.३८२, हनुमान नगर, नागपुर यांचे वडिल श्री अरुण सावळे व राहुल गुप्ता असे ०२ व्यक्ती ट्रॅव्हल्स क्रमांक एम.एच. २७ डी.बी. ३१३२ या ट्रॅव्हल्स ने प्रवास करीत असतांना ट्रॅव्हल्स चा अपघात झाल्याने मयत झाले आहे. सदर तपास तुम्ही केला असुन दिनांक ०८/०३/२०२४ रोजी गुन्हयांचे तपासाचे कागदपत्रासह पो.उप.आयु.परि-१ यांनी त्यांचे दालनात बोलावुन समक्ष चौकशी केली असता सदर गुन्हयांचा तपास पुर्ण करुन गुन्हयांमध्ये विद्यमान न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र क्र. ९४/२०२२, दिनांक ११/१०/२०२२ नुसार दाखल करण्यात आले असुन त्याचा कि.केस क्र. ३४३७/२०२२, दिनांक १५/१०/२०२२ असा आहे. तपासी अधिकारी यांनी गुन्हयांतील मृतक श्री अरुण सावळे यांचे अपघाताचा सविस्तर अहवाल (डी.ए.आर.) मा.ट्रिब्युनल न्यायालयास सादर केला आहे काय ? याबाबत विचारपुस केली असता तुम्ही मृतक यांचे मुलीला अर्जदार यांना गुन्हयांचे आवश्यक कागदपत्र पुरविण्यात आल्याचे सांगीतले परंतु अपघाताचा सविस्तर अहवाल (डी.ए.आर.) मा.ट्रिब्युनल न्यायालयास सादर केला नसल्याचे सांगीतले, तसेच सहायक सरकारी अभियोक्ता श्री सुनिल देशमुख यांची भेट घेतल्याचे सांगीतले. त्यांचे मार्फतीने (डी.ए.आर.) सादर करीत होतो, परंतु सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना न बोलाविल्यामुळे (डी.ए.आर.) सादर केला नसल्याचे सांगुन समाधानकारक उत्तर दिले नाही.

तसेच मृतक श्री अरुण सावळे यांची मुलगी (अर्जदार) यांनी दिनांक १५/०४/२०२३ रोजी पोलीस स्टेशन नांदगाव पेठ यांना सविस्तर अपघात अहवाल (डी.ए.आर.) क्लेम ट्रिब्युनल, अमरावती येथे सादर करण्याबाबत विनंती अर्ज दिला होता त्यानंतर देखील तपासी अधिकारी यांनी अपघाताचा सविस्तर अहवाल (डी.ए.आर.) ट्रिब्युनल न्यायालय, अमरावती येथे सादर न केल्यामुळे अर्जदार यांनी मा.जिल्हा न्यायाधिश कोर्ट नं. ०५ आणि अति.सत्र न्यायाधिश, अमरावती यांचे न्यायालयात अपघाताचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत दिनांक ०९/०८/२०२३ रोजी याचीका दाखल केली. त्या याचीकेवर विद्यमान न्यायालयाने दिनांक ३०/०९/२०२३ रोजी आदेश निर्गमित करुन अपघाताचा सविस्तर अहवाल एका आठवडयात ट्रिब्युनल न्यायालय येथे सादर करण्याबाबत आदेश पारित असतांना सुध्दा तपासी अधिकारी तुम्ही शासकीय कर्तव्य प्रामाणिकपणे न बजावता जाणीवपुर्वक निष्काळजीपणा केलेला आहे व कर्तव्यात अपघाताचा सविस्तर अहवाल (डी.ए.आर.) वेळेत विद्यमान ट्रिब्युनल न्यायालयात सादर करणे बंधनकारक असतांना अपघाताचा सविस्तर अहवाल सादर केलेला नाही व कर्तव्यात गुन्हयांचा तपास करतांना हलगर्जीपणा केला आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले असुन कर्तव्यात कसुर केला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले नसल्याने पुन्हा संधीचे पत्र क्रमांक ५१५३/२०२४, दिनांक २९/०५/२०२४ अन्वये संधी देण्यात आली असुन संधीचे पत्र सुध्दा तुम्हाला तामील झालेले आहे. तरी तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी आमचे समक्ष आज्ञांकित कक्षात मौखीक म्हणणे मांडले असुन

आज्ञांकित कक्षात समक्ष तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. २०००/- (अक्षरी - दोन हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतीत सादर करु शकता.

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**०१.पोआअ/आस्था-८/स्थावर मालमत्ता परवानगी/११२०७/२०२४ अमरावती दि. २७.१२.२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापने वरील **पोकॉ/१२००अमोल श्रीरामजी निचत,** नेमणुक, पो.स्टे.भातकुली अमरवती शहरहे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ नियम क्रमांक १९ (२) (३) मधील तदतुदीची पुर्तता करीत असल्याने त्यांना खालील नमुद केलेली स्थावर मालमत्ता (प्लॉट) स्वत:च्या नावाने खरेदीव्दारे संपादीत करण्यांची परवानगी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | स्थावर मालमत्ता धारकांचे नाव व पत्ता | मित्रागंण बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्स फर्म,एकुण ०६ भागीदार अमरावती |
| २ | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मौजा राहटगांव,प्रमाणे-नांदगांव पेठ,ता.जि.अमरावती ऑरबिट रेसिडेन्सी पार्क सर्व्हे नं.१८१/१/अ,-२ व १८१/३ मधील प्लॉट क्र. ३५ क्षेत्र फळ१०९.११ चौ.मी.(११७४.४६ चौ.फुट) |
| ३ | स्थावर मालमत्ता खरेदी व्दारे संपादित करण्यासाठी ठरविलेली किमंत | रु. ०६,९०,०००/- (एकुण सहा लाख नवद हजार रुपये फक्त ) |
| ४ | टोकन चिठ्ठी दिलेली रक्कम | ०१,००,०००/- (एक लाख रुपये फक्त ) |
| ५ | स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्यांस जमविलेल्या रक्कमेचा तपशिल | रु.५,००,०००/-<br>(AXIS BANK Approved Personal Loan)<br>रु.२,००,०००/- भावा कडुन उसनेवार |
| ६ | मत्ता व दायीत्व विवरण पत्र २०२३-२०२४ चे सादर केले आहे काय? | होय |
| ७ | शासकीय कर्मचाऱ्याने सदरची स्थावर | |

| | | |
|---|---|---|
| | मालमत्ता पुर्व परवानगी घेण्यापुर्वी खरेदी केली काय, कींवा पुर्व परवानगी घेवुन खरेदी करणार आहे, पुर्वीच खरेदी केली असल्यास खरेदीचा दिनांक | पुर्व परवानगी घेवून खरेदी करणार आहे. |
| ८ | वर नमुद कागद पत्रे अर्जा साबत जोडले आहे काय? | होय |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस